# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पीएमपीएमएल कडून भोसरी व चाकण एम.आय.डी.सी. साठी विविध स्थानकांहून असणाऱ्या बससेवेची माहिती

## ➢ तसेच मासुळकर कॉलनी साठी असणाऱ्या पीएमपीएमएलच्या बससेवेची माहिती

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांतून भोसरी व चाकण एम.आय.डी.सी. (औद्योगिक परिसर) साठी विविध बसस्थानकांहून बससेवा उपलब्ध आहे. भोसरी व चाकण एम.आय.डी.सी. मध्ये नोकरीस असणाऱ्या बहुसंख्य प्रवाशी नागरीकांना या बससेवेचा लाभ होत आहे.

- **भोसरी एम.आय.डी.सी. साठी विविध बस स्थानकांवरून असणाऱ्या पीएमपीएमएलच्या बससेवेची माहिती पुढीलप्रमाणेः-** भोसरी एम.आय.डी.सी. साठी पुणे मनपा भवन, पुणे स्टेशन, हडपसर, कात्रज, वारजे-माळवाडी, निगडी, चिंचवड गांव, पिंपरी, आळंदी व सांगवी या बसस्थानकांवरून दिवसभरात ३९ मार्गांवर २४१ बसेसद्वारे २६५४ फेऱ्या संचलनात आहेत.
- **चाकण एम.आय.डी.सी. साठी विविध बस स्थानकांवरून असणाऱ्या पीएमपीएमएलच्या बससेवेची माहिती पुढीलप्रमाणेः-** चाकण एम.आय.डी.सी. साठी भोसरी, निगडी, पिंपळे गुरव, तळेगांव दाभाडे, राजगुरूनगर व आळंदी या बसस्थानकांवरून दिवसभरात १० मार्गांवर ६७ बसेसद्वारे ७५६ फेऱ्या संचलनात आहेत.

**तसेच मासुळकर कॉलनीसाठी असणाऱ्या पीएमपीएमएलच्या बससेवेची माहिती खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | बसमार्ग क्र. | पासून-पर्यंत | मार्गे | बस संख्या | फेऱ्या | वारंवारीता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३०२अ | पिंपरीगांव ते आळंदी | मोरवाडी चौक, मासुळकर कॉलनी | ०१ | १५ | २ तास |
| २ | ३११ | पुणे स्टेशन ते पिंपरीगांव | वाय.सी.एम. हॉस्पिटल, मासुळकर कॉलनी | ०२ | १६ | १.३० मि. |
| ३ | ३७६ | मनपा भवन ते पिंपरीगांव | वाय.सी.एम. हॉस्पिटल, मासुळकर कॉलनी | ०२ | २० | १.१५ मि. |
| ४ | मेट्रो शटल ३२ | निगडी ते नाशिक फाटा | वाय.सी.एम. हॉस्पिटल, मासुळकर कॉलनी | ०१ | १२ | १ तास |
| | | | एकूण | ०६ | ६३ | |

भोसरी व चाकण एम.आय.डी.सी. तसेच मासुळकर कॉलनी साठी असलेल्या बससेवेचा लाभ विद्यार्थी, कामगार, नोकरदार व महिला प्रवाशी यांनी जास्तीत जास्त प्रमाणात घ्यावा, असे आवाहन परिवहन महामंडळामार्फत करणेत येत आहे.

sd/-

**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. १७/१०/२०२३

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

sd/-

**कामगार व जनता संपर्क अधिकारी**

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**